

सर्व वाचक, जाहिरातदार हितचिंतक यांना
श्रीकृष्ण जन्माष्टमी व दहीकाला उत्सवाच्या हार्दिक शुभेच्छा

महाराष्ट्र शासनाच्या यादीवरील अंक...
साप्ताहिक RNI : MAH/MAR/2011/40762 पोस्टल नंबर : MCW/354/2021-23

# धगधगती मुंबई

website:www.dhagdhagtimumbai.in E-mail : dhagdhagtimumbai@gmail.com

वर्ष : १६ अंक : ३०, संपादक - भिमराव हिंदुराव धुळप, मंगळवार, दिनांक ८ सप्टेंबर २०२६ ते १४ सप्टेंबर २०२६ पाने : ४ मूल्य : २ रुपये

## पुढील 10 वर्षांत मुंबई झोपडपट्टीमुक्त करण्याचे उद्दिष्ट; धारावी पुनर्विकासाला गती - मुख्यमंत्री



**मुंबई. : मुंबईचा सर्वांगीण आणि नियोजित विकास साधण्यासाठी क्लस्टर पद्धतीने पुनर्विकासाचे नियोजन करण्यात आले असून, पुढील दहा वर्षांत मुंबई झोपडपट्टीमुक्त करण्याचे उद्दिष्ट असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. 'नरेडको' महाराष्ट्राच्या 'चेंज ऑफ गार्ड' कार्यक्रमात ते बोलत होते.**

धारावी पुनर्विकास, म्हाडाच्या जुन्या वसाहतींचा पुनर्विकास आणि बेस्टच्या आगारांचा आधुनिक पद्धतीने विकास यामुळे मुंबईचा चेहरामोहरा बदलणार असल्याचे फडणवीस म्हणाले. जानेवारी २०२९ पर्यंत धारावीमध्ये १० हजार पुनर्वसन सदनिका तयार करण्याचे उद्दिष्ट असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

बेस्ट आगारांचा मिश्र वापरातून विकास करताना आधुनिक बस स्थानके, प्रवासी सुविधा, निवासी व व्यावसायिक प्रकल्पांसह संग्रहालये, क्रीडांगणे आणि मनोरंजनाच्या सुविधा विकसित केल्या जाणार आहेत. यामुळे बेस्टला उत्पन्नाचे नवे स्रोत उपलब्ध होतील.

दरम्यान, महाराष्ट्राने पहिल्या तिमाहीत ८.८ टक्के विकासदर नोंदविला असून, राज्याच्या आर्थिक प्रगतीत रिअल इस्टेट क्षेत्राची महत्त्वाची भूमिका असल्याचे मुख्यमंत्र्यांनी नमूद केले.

२०४७ पर्यंत एमएमआरची अर्थव्यवस्था १.५ ट्रिलियन डॉलरपर्यंत नेण्याचे उद्दिष्ट असून, 'मुंबई ३' आणि 'चौथी मुंबई' या संकल्पनांच्या माध्यमातून नव्या शहरी केंद्रांचा विकास करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

### धगधगती मुंबई व स्वरसाक्षी प्रतिष्ठानतर्फे घरगुती गणेश सजावट स्पर्धा

मुंबई : गणेशोत्सवानिमित्त सर्व गणेशभक्तांसाठी आनंदाची बातमी असून, 'धगधगती मुंबई' वृत्तपत्र आणि स्वरसाक्षी प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने यंदा घरगुती गणेश सजावट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत उत्कृष्ट गणेश सजावट करणाऱ्या विजेत्यांना प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकासह दोन उत्तेजनार्थ पारितोषिके देण्यात येणार आहेत. रोख रक्कम व सन्मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप राहणार आहे. तसेच सहभागी व विजेत्या गणेशमूर्तींच्या सजावटीला 'धगधगती मुंबई' वृत्तपत्रातून प्रसिद्धी देण्यात येणार आहे.

या स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या सर्व वाचक, जाहिरातदार आणि हितचिंतकांनी गणपतीची प्राणप्रतिष्ठा ज्या दिवशी होईल, त्याच दिवशी आपल्या घरातील गणपतीचा आकर्षक फोटो, नाव व संपूर्ण पत्ता पाठवावा. फोटो व माहिती पाठविण्याची अंतिम मुदत सोमवार, १४ सप्टेंबर रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत आहे.

फोटो व माहिती तसेच अधिक माहितीसाठी ९२२१११७६८४ / ९८७०७८०४१३ या क्रमांकांवर संपर्क साधावा.

स्वरसाक्षी प्रतिष्ठानचे संस्थापक-अध्यक्ष संतोष लिंबोरे आणि 'धगधगती मुंबई'चे संपादक भीमराव धुळप यांनी जास्तीत जास्त गणेशभक्तांनी या स्पर्धेत सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

## नमुंमपा शाळांचे शिक्षक गुणवंत विद्यार्थ्यांसोबत सुसंस्कृत नागरिक घडवितात – वनमंत्री गणेश नाईक

नवी मुंबई : नवी मुंबई महानगरपालिकेच्या शाळांमध्ये गुणवंत विद्यार्थ्यांसोबतच सुसंस्कृत आणि जबाबदार नागरिक घडविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य सुरू आहे. महापालिका शाळांमधील शिक्षण व संस्कारांचा दर्जा उच्च असून, त्याचे श्रेय शिक्षकांना जाते, असे प्रतिपादन महाराष्ट्राचे वनमंत्री गणेश नाईक यांनी केले.

वाशी येथील विष्णुदास भावे नाट्यगृहात नवी मुंबई महानगरपालिका शिक्षण विभागाच्या वतीने शिक्षक दिनानिमित्त आयोजित गुणगौरव सोहळ्यात ते बोलत होते. यावेळी महापौर सुजाता पाटील, उपमहापौर दशरथ भगत, अतिरिक्त आयुक्त डॉ. राहुल गेठे, शिक्षण विभागाच्या उपआयुक्त संघरत्ना खिल्लारे, शिक्षणाधिकारी अशोक कडुस यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.



बदलत्या काळानुसार शिक्षणपद्धती आणि शैक्षणिक साधनांमध्ये बदल झाले असले, तरी शिक्षकांप्रती विद्यार्थ्यांच्या मनातील आदर कायम असल्याचे नाईक यांनी नमूद केले.

महापौर सुजाता पाटील यांनी महापालिका शाळांमध्ये केजीचे वर्ग इंग्रजी माध्यमातून सुरू करण्यात आल्याची माहिती दिली. चांगला शिक्षक केवळ विद्यार्थ्यांचे शैक्षणिक गुण वाढवत नाही, तर त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास घडवतो, असे त्यांनी सांगितले.

यावेळी शिष्यवृत्ती, एसएससी बोर्ड परीक्षा, विविध स्पर्धा, क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांसह मार्गदर्शक शिक्षकांचा सन्मान करण्यात आला. तसेच सेवानिवृत्त मुख्याध्यापक व शिक्षकांनाही गौरविण्यात आले.




### 'एक हंडी दिव्यांगांसाठी' धगधगती मुंबई व शिवसेना माहीम विधानसभेचा सामाजिक उपक्रम

## कमला मेहता अंध मुलींच्या शाळेतील विद्यार्थिनींसोबत विशेष दहीकाला; आठ थरांचा मानवी मनोरा रचत अमर सुभाष गोविंदा पथकाने फोडली दहीहंडी

मुंबई : दहीकाला उत्सव म्हणजे उत्साह, जल्लोष आणि गोविंदांच्या थरारक मानवी मनोऱ्यांचा सोहळा; मात्र या उत्सवाला सामाजिक बांधिलकीची जोड देत 'एक हंडी दिव्यांगांसाठी' हा अभिनव उपक्रम राबविण्यात आला. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) माहीम विधानसभा आणि 'धगधगती मुंबई' वृत्तपत्र परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दहीकाला उत्सव यंदा सामाजिक संवेदनशीलतेचा संदेश देत उत्साहात पार पडला.

दहीकाला उत्सवाच्या पूर्वसंध्येला दादर पूर्व येथील कमला मेहता अंध मुलींच्या शाळेत विद्यार्थिनींसोबत विशेष दहीकाला उत्सव साजरा करण्यात आला. दृष्टी नसतानाही विद्यार्थिनींच्या चेहऱ्यावर फुललेला आनंद आणि उत्साह यावेळी उपस्थितांचे लक्ष वेधून घेत होता. विद्यार्थिनींना श्रीकृष्णाची प्रतिकृती असलेले सन्मानचिन्ह, प्रशस्तीपत्र, रोख रक्कम तसेच खाऊचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थिनींच्या आनंदात द्विगुणित भर पडली. यावेळी संस्थेच्या विश्वस्त वर्षा जाधव आणि मुख्याध्यापिका तन्वी म्हाडदळकर उपस्थित होत्या.



**आठ थरांचा थरार; अमर सुभाष गोविंदा पथकाची दहीहंडी**

दहीकाला उत्सवाच्या मुख्य दिवशी शेकडो गोविंदा पथकांनी उपस्थिती लावत उत्सवाची रंगत वाढवली. अमर सुभाष गोविंदा पथकाने आठ थरांचा मानवी मनोरा रचत दहीहंडी फोडली. गोविंदांच्या जल्लोषाने आणि 'गोविंदा आला रे आला'च्या घोषणांनी परिसर दणाणून गेला.

यावेळी स्वीकृत नगरसेवक साईनाथ दुर्गे, नगरसेवक यशवंत किल्लेदार, नगरसेवक निशिकांत शिंदे, शाखाप्रमुख शैलेश माळी, शिवसेना अपंग सहाय्य सेनेचे अध्यक्ष सूर्यकांत लाडे, विधानसभा निरीक्षक आयोजक यशवंत विचले, संपादक,पत्रकार भीमराव धुळप, शिवसेनेचे संजय केणी, प्रवीण शेट्टी, चंद्रकांत झगडे, अनंत हरमलकर,विशाल चाफे,सौ. सायली यशवंत विचले यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते, पत्रकार बांधव आणि विविध क्षेत्रांतील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

( उर्वरित वृत्त पान २ वर )

## संपादकीय

# गणेशोत्सव हवा, पण ध्वनिप्रदूषणाचा दणदणाट नको!

गणेशोत्सव हा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि सामाजिक जीवनाचा अविभाज्य भाग आहे. विघ्नहर्त्या गणरायाचे आगमन म्हणजे भक्ती, आनंद, उत्साह आणि सामाजिक एकोप्याचा सोहळा. सार्वजनिक गणेशोत्सवाच्या माध्यमातून समाजप्रबोधन, सामाजिक बांधिलकी आणि एकतेचा संदेश देण्याची समृद्ध परंपरा महाराष्ट्राला लाभली आहे. मात्र कालांतराने उत्सवाचे स्वरूप बदलत गेले आणि ध्वनिप्रदूषण, अवाजवी खर्च तसेच दिखाव्याची स्पर्धा वाढताना दिसत आहे.

विशेषतः डीजे साऊंड सिस्टिमच्या कर्णकर्कश आवाजाचा प्रश्न गंभीर बनला आहे. गणेशोत्सवातील मिरवणुका, मंडप आणि विविध कार्यक्रमांमध्ये मोठ्या आवाजात डीजे वाजवण्याची जणू स्पर्धाच सुरू झाली आहे. या प्रचंड आवाजाचा त्रास ज्येष्ठ नागरिक, लहान मुले, विद्यार्थी, रुग्ण तसेच गर्भवती महिलांना सहन करावा लागतो. रात्रपाळी करून विश्रांती घेणाऱ्या नागरिकांचीही झोप आणि आरोग्य धोक्यात येते. एवढेच नव्हे, तर पक्षी आणि प्राण्यांवरही या ध्वनिप्रदूषणाचा विपरीत परिणाम होतो.

अलीकडेच डीजेच्या कर्कश आवाजामुळे एका तरुणाला चक्कर येऊन तो बेशुद्ध पडून त्याचा मृत्यू घटना समोर आली आहे. अशा घटना केवळ अपवाद म्हणून दुर्लक्षित करता येणार नाहीत. उत्सवाच्या आनंदासाठी दुसऱ्याच्या आरोग्याचा बळी जाणे ही निश्चितच चिंतेची बाब आहे.

येथे एक गोष्ट स्पष्ट करणे आवश्यक आहे—डीजे किंवा आधुनिक साऊंड सिस्टिमला विरोध नाही; मात्र त्याच्या अमर्याद आणि कर्णकर्कश वापराला नक्कीच विरोध आहे. शासन आणि प्रशासनाने ध्वनीविषयक नियम व मार्गदर्शक तत्त्वे निश्चित केली आहेत. त्यांचे पालन करणे ही गणेश मंडळांबरोबरच साऊंड सिस्टिम चालक आणि मालकांचीही जबाबदारी आहे. ध्वनीची मर्यादा, निर्धारित वेळेचे पालन आणि नियमांचे काटेकोर पालन झाले, तर उत्सवाचा आनंदही कायम राहील आणि नागरिकांनाही त्रास होणार नाही.

गणेशोत्सवातील पारंपरिक ढोल-ताशे, लेझीम, भजन, कीर्तन आणि सांस्कृतिक कार्यक्रम ही महाराष्ट्राची खरी ओळख आहे. आधुनिकतेचा स्वीकार करताना आपल्या परंपरेला मागे टाकणे योग्य नाही.

प्रशासनाने नियमभंग करणाऱ्यांवर कोणताही भेदभाव न करता कारवाई करावी. गणेश मंडळांनीही सामाजिक जबाबदारी स्वीकारून ध्वनिप्रदूषणमुक्त उत्सवाचा आदर्श निर्माण करावा. साऊंड सिस्टिम चालकांनीही केवळ व्यवसाय न पाहता नागरिकांच्या आरोग्याचा विचार करावा.

गणेशोत्सव हा आवाजाची ताकद दाखवण्याचा नव्हे, तर भक्तीची ताकद दाखवण्याचा उत्सव आहे. डीजेचा आवाज जितका मोठा, तितकी भक्ती मोठी, असे समीकरण असू शकत नाही. उलट शिस्त, संस्कृती, संयम आणि सामाजिक संवेदनशीलता यामुळेच गणरायाच्या उत्सवाचे खरे सौंदर्य खुलते.

'उत्सव हवा, आनंद हवा; पण दुसऱ्याला त्रास नको!' हा विचार प्रत्येक गणेश मंडळ, साऊंड सिस्टिम चालक आणि नागरिकाने स्वीकारला, तर गणेशोत्सव खऱ्या अर्थाने आनंदोत्सव आणि सामाजिक सलोख्याचा उत्सव ठरेल.

## साक्षरतेचे प्रमाण वाढण्याची गरज

८ सप्टेंबर हा दिवस जगभरात जागतिक साक्षरता दिन म्हणून साजरा केला जातो. साक्षरता म्हणजे केवळ अक्षरओळख नव्हे, तर माहिती समजून घेणे, योग्य निर्णय घेणे, स्वतःच्या हक्कांची जाणीव ठेवणे आणि समाजाच्या प्रगतीत योगदान देण्याची क्षमता होय.

निरक्षरता ही व्यक्तीच्या सामाजिक, आर्थिक आणि वैयक्तिक विकासातील मोठा अडथळा आहे. अज्ञानामुळे होणारी फसवणूक, पिळवणूक आणि शोषण रोखण्यासाठी शिक्षण अत्यंत महत्त्वाचे आहे. आजच्या डिजिटल युगात वाचन-लेखनासोबतच डिजिटल साक्षरता, ऑनलाइन माहितीची सत्यता तपासण्याची क्षमता आणि आर्थिक व्यवहारांचे ज्ञानही आवश्यक झाले आहे.

भारताने स्वातंत्र्यानंतर साक्षरतेच्या क्षेत्रात मोठी प्रगती केली असली, तरी शंभर टक्के साक्षरतेचे उद्दिष्ट अद्याप पूर्ण झालेले नाही. ग्रामीण भागातील निरक्षरता, आर्थिक अडचणी, शाळाबाह्य मुले आणि मुलींच्या शिक्षणातील अडथळे ही आव्हाने कायम आहेत.

साक्षर भारत घडविण्याची जबाबदारी केवळ शासनाची नसून पालक, शिक्षक, स्वयंसेवी संस्था आणि प्रत्येक सुशिक्षित नागरिकाची आहे. 'स्वतः साक्षर होऊया, इतरांनाही साक्षर करूया' हा संकल्प करून ज्ञानाचा प्रकाश सर्वदूर पोहोचवूया.

**- श्याम ठाणेदार, दौंड, जिल्हा पुणे**

## पत्रकारांच्या आरोग्याची काळजी घेण्याला शासनाचे प्राधान्य - मुख्यमंत्री

मुंबई : अनियमित कामाच्या वेळा, तासनतास घटनास्थळी आणि रस्त्यावर राहून वार्तांकन करण्यामुळे पत्रकारांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता असते. त्यामुळे पत्रकारांच्या आरोग्य तपासणी व उपचारांसाठी आयोजित करण्यात आलेले शिबिर महत्त्वपूर्ण ठरेल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री सहायता निधी आणि धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाच्या समन्वयाने विधानभवन येथे पत्रकारांसाठी विशेष आरोग्य तपासणी व उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले. मुख्यमंत्री फडणवीस यांनी शिबिराला भेट देऊन पत्रकारांच्या आरोग्याची आस्थेने विचारपूस केली. या शिबिरात ८९२ जणांची आरोग्य तपासणी करण्यात आली.

शिबिरात हृदयरोग, नेत्ररोग, अस्थिरोग, त्वचारोग, कर्करोग, पोटविकार, मानसिक आरोग्य, दंतचिकित्सा, रक्त तपासणी यांसह विविध वैद्यकीय विभागांच्या सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या.

पत्रकार आणि त्यांच्या कुटुंबीयांना आजारपणाच्या काळात उपचार व वैद्यकीय समन्वयासाठी मुख्यमंत्री सहायता निधीत स्वतंत्र नोडल अधिकारी नियुक्त करण्यात आल्याची माहितीही फडणवीस यांनी दिली. हा उपक्रम वर्षभर सातत्याने सुरू ठेवण्यासाठी प्रयत्न केले जातील, असे त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल



नार्वेकर, विधानपरिषदेचे उपसभापती सचिन अहिर, रामेश्वर नाईक तसेच विविध पत्रकार संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

# शैक्षणिक व पर्यावरणपूरक कार्याची दखल

## अमोघसिद्ध पाटील यांचा 'आदर्श मुख्याध्यापक' म्हणून गौरव




कामोठे, नवी मुंबई : पनवेल महानगरपालिका वृक्ष प्राधिकरण आणि कामोठे टीचर्स असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार, ६ सप्टेंबर २०२६ रोजी दि. बा. पाटील विद्यालय, कामोठे येथे विशेष सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले.

यावेळी पनवेल महानगरपालिकेचे महापौर श्री. नितीन पाटील आणि उपमहापौर सौ. प्रमिलाताई पाटील यांच्या हस्ते अमोघसिद्ध पाटील यांचा 'आदर्श मुख्याध्यापक' म्हणून गौरव करण्यात आला. त्यांच्या आजवरच्या शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्यासोबतच पर्यावरण संवर्धन व जनजागृतीसाठी केलेल्या कार्याची दखल घेत हा सन्मान प्रदान करण्यात आला.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासोबतच पर्यावरणपूरक उपक्रमांना प्रोत्साहन देत शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या अमोघसिद्ध पाटील यांच्या कार्याचे यावेळी उपस्थित मान्यवरांनी कौतुक केले. त्यांच्या या सन्मानाबद्दल शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी आणि शिक्षणप्रेमींनी अभिनंदन केले.

## साईनाथ दुर्गे यांच्या मातोश्री शांता दुर्गे यांचे निधन

मुंबई : शिवसेनेचे नगरसेवक साईनाथ दुर्गे यांच्या मातोश्री श्रीमती



शांता शिवाजी दुर्गे यांचे अल्पशा आजाराने रविवारी दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने दुर्गे कुटुंबीय, नातेवाईक, मित्रपरिवार तसेच परिसरात शोककळा पसरली.

शांता दुर्गे या प्रेमळ, मनमिळावू व कुटुंबवत्सल स्वभावाच्या होत्या. त्यांची अंत्ययात्रा दादर येथील संकेत सोसायटी, भवानी शंकर रोड व आगाशे पथ येथील निवासस्थानाहून निघाली. शिवाजी पार्क स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी शिवसेनेसह विविध क्षेत्रांतील मान्यवर, पदाधिकारी, कार्यकर्ते, नातेवाईक व मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते.शांता दुर्गे यांच्या पवित्र आत्म्यास चिरशांती लाभो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

## बीग बेलच्या सुगंधी अगरबत्ती बाजारात




मुंबई : सुगंधी अगरबत्तीच्या क्षेत्रात नाविन्यपूर्ण उत्पादने सादर करणाऱ्या बीग बेल कंपनीने विविध नैसर्गिक सुगंधांनी युक्त अगरबत्त्यांची आकर्षक श्रेणी बाजारात उपलब्ध करून दिली आहे. धार्मिक विधी, ध्यानधारणा तसेच घरातील वातावरण प्रसन्न आणि सुगंधित ठेवण्यासाठी या अगरबत्त्यांना ग्राहकांची पसंती मिळत आहे. बीग बेलच्या उत्पादनांमध्ये कच्च्या बेला, व्हाईट मस्क, रोज इन्सेन्स स्टिक, उद इन्सेन्स स्टिक, सॅण्डल इन्सेन्स स्टिक, ब्ल्यू नाईट प्रीमियम बेस बत्ती, स्वामी आणि सुगंध रत्ना अशा विविध प्रकारांचा समावेश आहे. प्रत्येक अगरबत्तीला वैशिष्ट्यपूर्ण सुगंध असून ग्राहकांच्या विविध आवडी लक्षात घेऊन ही उत्पादने तयार करण्यात आली आहेत.

बीग बेलच्या सुगंधी अगरबत्त्या ग्राहकांना घरबसल्या ऑनलाइनही मागवता येणार आहेत. विविध प्रकारच्या अगरबत्त्यांची माहिती आणि ऑर्डरसाठी www.bigbelincense.com या कंपनीच्या अधिकृत संकेतस्थळाला भेट देता येईल.

नैसर्गिक सुगंध, विविध प्रकार आणि आकर्षक पर्याय यामुळे बीग बेलच्या अगरबत्त्या ग्राहकांसाठी सुगंधाचा सुखद अनुभव देणारा पर्याय ठरत आहेत.

उर्वरित वृत्त पान १ वरुन

## 'एक हंडी दिव्यांगांसाठी' धगधगती मुंबई व शिवसेना माहीम विधानसभेचा सामाजिक उपक्रम

## कमला मेहता अंध मुलींच्या शाळेतील विद्यार्थिनींसोबत विशेष दहीकाला; आठ थरांचा मानवी मनोरा रचत अमर सुभाष गोविंदा पथकाने फोडली दहीहंडी

**सामाजिक उपक्रमाची परंपरा कायम**

'धगधगती मुंबई' परिवाराच्या वतीने दरवर्षी दहीकाला उत्सवाला सामाजिक उपक्रमाची जोड देण्यात येते. गेल्या वर्षी कॅन्सरग्रस्त रुग्णांच्या मदतीसाठी 'एक हंडी' हा उपक्रम राबविण्यात आला होता. यंदा 'एक हंडी दिव्यांगांसाठी' हा सामाजिक संकल्प करण्यात आला. सामाजिक, शैक्षणिक आणि सेवाभावी उपक्रमांच्या माध्यमातून दहीकाला उत्सव अधिक अर्थपूर्ण करण्याचा प्रयत्न दरवर्षी केला जात असल्याचे आयोजकांनी सांगितले.

**गोविंदा पथकांचा सन्मान; २ लाख ५१ हजारांची बक्षिसे**

उत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी बृहन्मुंबई महानगरपालिका आणि दादर पोलीस ठाणे यांचे विशेष सहकार्य लाभले. उत्सवात सहभागी होऊन सलामी देणाऱ्या सर्व गोविंदा पथकांचा सन्मानचिन्ह, रोख पारितोषिक आणि 'केंब्रिज'चा शर्ट देऊन गौरव करण्यात आला. यंदाच्या दहीकाला उत्सवासाठी एकूण २ लाख ५१ हजार रुपयांची बक्षिसे ठेवण्यात आली होती.

उत्सवाला उपस्थित राहून दहीकाला उत्सवाची शोभा वाढविणाऱ्या सर्व गोविंदा पथकांचे, पदाधिकारी, कार्यकर्ते, पत्रकार बांधव, पोलीस प्रशासन, महानगरपालिका अधिकारी-कर्मचारी तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवरांचे आयोजकांच्या वतीने मनःपूर्वक आभार मानण्यात आले.

उत्सवाच्या जल्लोषासोबत सामाजिक संवेदनशीलतेचा संदेश देणारा 'एक हंडी दिव्यांगांसाठी' हा उपक्रम यंदाच्या दहीकाला उत्सवाचे विशेष आकर्षण ठरला.

साप्ताहिक
धगधगती मुंबई



# पत्रकारांसाठी आयुष्यमान भारत, एसटी सवलत कार्ड व पोस्टाच्या योजनांचे विशेष शिबिर

मुंबई : मुंबई मराठी पत्रकार संघातर्फे पत्रकार व त्यांच्या कुटुंबीयांसाठी मंगळवार, दि. ८ सप्टेंबर २०२६ रोजी विविध शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर सकाळी ९ ते दुपारी ३ या वेळेत मुंबई मराठी पत्रकार संघाच्या इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावर, महापालिका मुख्यालयासमोर, आझाद मैदान, फोर्ट येथे होणार आहे.

शिबिरात आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जनआरोग्य योजना, महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना तसेच आयुष्मान वय वंदन योजनेची माहिती व नोंदणी सुविधा उपलब्ध असेल. पात्र लाभार्थ्यांना पाच लाख रुपयांपर्यंतचे आरोग्य संरक्षण मिळू शकते. तसेच एसटी महामंडळाचे महिला, ज्येष्ठ नागरिक व अमृत ज्येष्ठ नागरिकांसाठी सवलत कार्ड, पोस्ट ऑफिसच्या विविध बचत योजना, आधार कार्ड, अपघाती विमा, पोस्टल लाईफ इन्शुरन्स (PLI) व 'माय स्टॅम्प' आदी सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

लाभार्थ्यांनी आधार कार्ड, पॅन कार्ड, रेशन कार्ड, पगारपत्रक आदी आवश्यक कागदपत्रे सोबत आणावीत. अधिक माहितीसाठी राजेंद्र साळसकर (मो. ९३२३१८४१४२) यांच्याशी संपर्क साधावा.

संदीप चव्हाण, अध्यक्ष; शैलेंद्र शिर्के, कार्यवाह; राजेंद्र साळसकर, शिबिर समन्वयक यांनी पत्रकार सदस्यांनी व त्यांच्या कुटुंबीयांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

# गणेशभक्तांच्या गावाकडच्या प्रवासासाठी 2,900 एसटी बस सज्ज - एकनाथ शिंदे

ठाणे : गणेशोत्सवानिमित्त कोकणासह पश्चिम महाराष्ट्रातील आपल्या गावी जाणाऱ्या गणेशभक्तांचा प्रवास सुरक्षित, सुखकर आणि आरामदायी व्हावा, यासाठी शिवसेनेच्या वतीने मोफत बससेवेचा उपक्रम राबविण्यात आला आहे. या उपक्रमांतर्गत तब्बल २,९०० एसटी बसची व्यवस्था करण्यात आली असून, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते मोफत बससेवेच्या तिकीट वितरणाचा शुभारंभ करण्यात आला.



यावेळी शिंदे म्हणाले की, गणेशोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव नसून समाजाला एकत्र आणणारी आणि संस्कृती-परंपरा जपणारी मोठी चळवळ आहे. लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सवाच्या माध्यमातून समाजाला एकत्र आणले. हीच परंपरा पुढे नेत गणेश मंडळांकडून सामाजिक प्रबोधन आणि समाजोपयोगी उपक्रम राबविले जात आहेत. कोकण व पश्चिम महाराष्ट्रात जाणाऱ्या नागरिकांना रेल्वे किंवा अन्य वाहतुकीची तिकिटे सहज उपलब्ध होत नसल्याने सामाजिक बांधिलकीतून हा उपक्रम राबविण्यात येत असल्याचे शिंदे यांनी सांगितले.

दरवर्षी हा उपक्रम सुरू ठेवण्याचा निर्धारही त्यांनी व्यक्त केला. यावेळी खासदार नरेश म्हस्के, आनंद परांजपे, राम रेपाळे यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महत्त्वाच्या घडामोडी.....

### मुंबईत ग्लोबल फिनटेक फेस्टला उद्यापासून सुरुवात...

मुंबई : ग्लोबल फिनटेक फेस्ट २०२६ ला मुंबईत उद्यापासून सुरुवात होणार असून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्घाटन होणार आहे. चार दिवस चालणाऱ्या या परिषदेत वित्तीय तंत्रज्ञान, डिजिटल पेमेंट आणि कृत्रिम बुद्धिमत्तेसह विविध विषयांवर चर्चा होणार आहे.

### मुंबईत पावसाची शक्यता; काही भागांत यलो अलर्ट...

**मुंबई :** महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांमध्ये पावसाची शक्यता वर्तवण्यात आली असून हवामान विभागाने काही भागांसाठी यलो अलर्ट जारी केला आहे. मुंबई, पुण्यासह विविध ठिकाणी हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता असल्याने नागरिकांनी काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### गणेशोत्सवात 'डीजे'ला लगाम घालण्याचे आवाहन...

**महाराष्ट्र :** गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर ध्वनी प्रदूषणाचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. आरोग्याच्या दृष्टीने मोठ्या आवाजातील डीजे टाळून पारंपरिक पद्धतीने उत्सव साजरा करण्याचे आवाहन राज्यातील मंत्र्यांकडून करण्यात आले आहे.

### दिल्ली इमारत दुर्घटनेत सहा जणांचा मृत्यू....

**नवी दिल्ली :** राजधानी दिल्लीतील सत्य निकेतन परिसरात पाच मजली इमारत कोसळून सहा जणांचा मृत्यू झाला, तर सहा जण जखमी झाले. बचाव पथकांकडून ढिगाऱ्याखाली अडकलेल्या व्यक्तींचा शोध सुरू आहे. जुन्या इमारतींच्या सुरक्षिततेचा प्रश्न या दुर्घटनेमुळे पुन्हा चर्चेत आला आहे.

### आरबीआयकडून बँकिंग व्यवस्थेतील अतिरिक्त रोकड शोषून घेण्याची प्रक्रिया...

**मुंबई :** बँकिंग व्यवस्थेतील अतिरिक्त तरलता कमी करण्यासाठी भारतीय रिझर्व्ह बँकेने मोठ्या प्रमाणात रोकड शोषून घेण्याची प्रक्रिया राबवली आहे. आरबीआयने विविध कालावधीच्या व्यवहारांतून मोठ्या प्रमाणावर निधी स्वीकारला असून बाजारातील तरलता व्यवस्थापनावर त्याचा परिणाम होण्याची शक्यता आहे.

### मुंबईत उंदरांचा वाढता उपद्रव; महापालिकेची कारवाई...

**मुंबई :** मुंबईतील विविध भागांत वाढलेल्या उंदरांच्या उपद्रवाविरोधात महापालिकेच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने कारवाई तीव्र केली आहे. ४६ दिवसांत तब्बल ४,७०२ उंदरांचा बंदोबस्त करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. उंदरांमुळे संसर्गजन्य आजारांचा धोका वाढत असल्याने नागरिकांनी परिसर स्वच्छ ठेवण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# गिरणी कामगारांच्या घरांचा प्रश्न तातडीने सोडवा; न्यायालयीन आदेशाची अंमलबजावणी करण्याची मागणी

मुंबई : मुंबईच्या उभारणीत मोलाचे योगदान देणाऱ्या गिरणी कामगारांच्या घरांचा प्रश्न गेली अनेक वर्षे प्रलंबित असून, त्यांचे मुंबईतच सन्मानपूर्वक पुनर्वसन करण्यात यावे, अशी मागणी संयुक्त मराठी मुंबई चळवळीने केली आहे.




संयुक्त मराठी मुंबई चळवळीचे सरचिटणीस तथा बॉम्बे डाइंग गिरणी कामगार गोपाळ बाबुराव शेलार, बाळाराम पाटील व त्यांच्या ३४ सहकाऱ्यांनी मुंबई उच्च न्यायालयात रिट याचिका क्र. १७३८/२०२६ दाखल केली आहे. या प्रकरणी १४ ऑगस्ट २०२६ रोजी न्यायालयाने संबंधित तक्रारींचा कायद्यानुसार विचार करून कारणांसहित निर्णय घेण्याचे निर्देश म्हाडाला दिले आहेत. त्यामुळे या आदेशाची तातडीने अंमलबजावणी करावी, अशी मागणी करण्यात आली.

मुंबईतील उपलब्ध जमिनींचा गिरणी कामगारांच्या पुनर्वसनासाठी प्राधान्याने विचार करावा, सेंच्युरी गिरणीशेजारील जमिनीचा पुनर्वसनासाठी विचार करावा, तसेच शेलू-वांगणी योजनेच्या डीपीआरसाठी वापरलेल्या संमतीपत्रांची पारदर्शक पडताळणी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

ऑक्टोबर १९८१ च्या संपातील कामगारांना गृहनिर्माण योजनेत सामावून घ्यावे, संक्रमण शिबिरातील रिक्त सदनिका गिरणी कामगारांना द्याव्यात आणि २०.८३ एकर जमिनीसह इतर उपलब्ध जमिनींबाबत तातडीने निर्णय घ्यावा, अशीही मागणी आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गिरणी कामगारांच्या सर्व प्रलंबित प्रश्नांवर तातडीने बैठक घेऊन कालबद्ध कृती आराखडा जाहीर करावा, अशी मागणी गोपाळ शेलार, कार्याध्यक्ष रमाकांत बने यांनी पत्रकार परिषदेत केली.

# नेपाळमध्ये अडकलेले 54 भारतीय सुखरूप मुंबईत दाखल; शिवसेनेच्या वतीने राहुल शेवाळे यांनी केले स्वागत

**मुंबई : नेपाळमधील महापुरामुळे चीन-नेपाळ सीमेवर अडकून पडलेले कैलास मानसरोवर यात्रेतील ५४ भारतीय भाविक अखेर सुखरूप मुंबईत दाखल झाले. गुरुवारी सायंकाळी ६.३० वाजता छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर पोहोचलेल्या भाविकांचे शिवसेनेचे सरचिटणीस तथा माजी खासदार राहुल शेवाळे, आमदार मंगेश कुडाळकर, आमदार मुरजी पटेल व शिवसेना पदाधिकाऱ्यांनी स्वागत केले.**

भाविकांचे नातेवाईकांसह जंगी स्वागत करण्यात आले. यावेळी राहुल शेवाळे यांनी भाविकांना मिठाई भरवून व पुष्पगुच्छ देत त्यांच्याशी संवाद साधला. २२ ऑगस्ट रोजी कैलास मानसरोवर यात्रेसाठी नेपाळमध्ये गेलेला हा ५४ जणांचा ग्रुप महापुरामुळे चीन सीमेवर अडकला होता. माहिती मिळताच शिवसेनेच्या मदत कक्षामार्फत भाविकांशी संपर्क साधण्यात आला. राहुल शेवाळे आणि उपमुख्यमंत्री



एकनाथ शिंदे यांनी व्हिडिओ कॉलद्वारे त्यांना धीर दिला. महाराष्ट्र शासन, भारतीय दूतावास व नेपाळ दूतावासाच्या समन्वयातून भाविकांना काठमांडू येथे आणण्यात आले आणि तेथून विमानाने मुंबईत परत आणण्यात आले.

"संकटाच्या काळात भाविकांच्या पाठीशी उभे राहून त्यांना सुखरूप मायदेशी आणण्यात आले," असे राहुल शेवाळे यांनी सांगितले. भाविकांनी महाराष्ट्र शासन, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, राहुल शेवाळे आणि शिवसेना पदाधिकाऱ्यांचे आभार मानले.

# गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर नवी मुंबईतील रस्ते सुधारणेला वेग

**नवी मुंबई : गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील रस्ते सुस्थितीत ठेवण्यासाठी अभियांत्रिकी विभागाने विशेष मोहीम हाती घेतली आहे. महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार शहर अभियंता शिरीष आरदवाड यांच्या मार्गदर्शनाखाली विभागनिहाय पथकांमार्फत रस्त्यांची पाहणी करून दुरुस्तीची कामे वेगाने करण्यात येत आहेत.**



गणेशमूर्तींचे आगमन-विसर्जन मार्ग तसेच प्रमुख रस्त्यांना प्राधान्य देण्यात आले असून, खड्डे, खराब पृष्ठभाग, उंच-सखल पातळी, ड्रेनेज व विविध झाकणांची स्थिती तपासली जात आहे. पावसाळ्यात खड्डे मास्टिक जिओपॉलिमर अथवा कोल्डमिक्सने बुजविण्यात येत असून, पावसाची उघडीप मिळाल्यानंतर नियमित डांबरीकरण करण्यात येणार आहे.

गणेशोत्सव निर्विघ्न पार पडण्यासाठी रस्त्यांसोबतच स्वच्छता, दिवाबत्ती आणि विसर्जनस्थळांवरील सुविधांकडेही लक्ष दिले जात आहे. नागरिकांनी महापालिकेस सहकार्य करून गणेशोत्सव पर्यावरणपूरक, प्लास्टिकमुक्त, सुरक्षित व शिस्तबद्ध पद्धतीने साजरा करावा, असे आवाहन महापौर सुजाता पाटील व आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी केले आहे.

## संजय को-ऑपरेटिव्ह सोसायटीची
## ३५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात संपन्न

**मुंबई :** संजय को-ऑपरेटिव्ह सोसायटीची ३५वी वार्षिक सर्वसाधारण सभा शिवाजी नाट्यमंदिर, दादर येथे सकाळी १० वाजता उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. संस्थेचे संस्थापक संचालक संजय भाऊ चवरे यांनी सभेचे अध्यक्षस्थान भूषविले. या वार्षिक सभेला सोसायटीचे सभासद, विद्यार्थी तसेच हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते. खेळीमेळीच्या आणि आनंददायी वातावरणात सभेचे कामकाज यशस्वीरीत्या पार पडले.

सभेचे प्रमुख आकर्षण ठरले ते म्हणजे सभासदांच्या गुणवंत पाल्यांचा गुणगौरव सोहळा. दरवर्षीप्रमाणे यंदाही दहावी, बारावी तसेच पदवी परीक्षेत उल्लेखनीय




यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा संस्थेच्या वतीने सन्मान करण्यात आला. गुणवंत विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह, पुष्पगुच्छ आणि शैक्षणिक भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले. यावेळी संस्थेचे संपूर्ण संचालक मंडळ उपस्थित होते. तसेच संस्थेच्या कर्मचारी वर्गाने सभेच्या यशस्वी आयोजनासाठी परिश्रम घेतले. सर्वांच्या सहकार्यामुळे ३५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात आणि सुरळीतपणे संपन्न झाली.

## महाराजा अगरबत्तीची 'पल्सर' आणि 'बेला प्युअर बँड' बाजारात

मुंबई : अगरबत्ती क्षेत्रात आपल्या दर्जेदार उत्पादनांसाठी ओळखल्या जाणाऱ्या महाराजा अगरबत्ती कंपनीने सणासुदीचे विशेष महत्त्व लक्षात घेऊन 'पल्सर' आणि 'बेला प्युअर बँड' या सुगंधी अगरबत्त्या बाजारात उपलब्ध करून दिल्या आहेत.

मनमोहक सुगंधामुळे प्रार्थना व धार्मिक वातावरण अधिक प्रसन्न होण्यास मदत होते. उत्तम दर्जाची काडी आणि सुगंधी परफ्युमच्या वापरामुळे अगरबत्ती दीर्घकाळ जळते तसेच विझल्यानंतरही सुगंध बराच वेळ दरवळतो. या अगरबत्त्या ५०, १०० आणि २५० ग्रॅमच्या पॅकिंगमध्ये उपलब्ध आहेत. प्रार्थना, मिस्टिक मस्क, मिस्टिक रोझ, टेंपल ब्लिस, रॉयल ऊद, हिना, सुखद सॅण्डल, कस्तुरी, लव्हेंडर, सॅण्डलवुड, स्वामी, काश्मिरी लव्हेंडर, अंगारे ऊद आदी विविध प्रकारही उपलब्ध आहेत.

ग्राहकांनी अगरबत्ती खरेदी करताना महाराजा अगरबत्ती कंपनीचा लोगो तपासूनच खरेदी करावी, असे आवाहन करण्यात आले आहे. उत्पादने विविध अगरबत्ती विक्रेत्यांकडे तसेच रघुनाथ निवास, डी.व्ही. देशपांडे मार्ग, शिवाजी पार्क रोड क्र. ४, दादर पश्चिम, मुंबई-४०००२८ येथे उपलब्ध आहेत. अधिक माहितीसाठी ८३६९१८५०७१ या क्रमांकावर संपर्क साधावा.

## मुंबई रेशन दुकानदार संघटनेचे अध्यक्ष नवीन मारू यांचा वाढदिवस उत्साहात साजरा




मुंबई : मुंबईतील रेशन दुकानदारांची सर्वोच्च संस्था 'मुंबई रेशन दुकानदार संघटना'चे अध्यक्ष श्री नवीन मारू यांचा वाढदिवस मुंबई जनता दल (सेक्युलर) च्या कार्यालयात अत्यंत उत्साहात आणि थाटामाटात साजरा करण्यात आला. या विशेष प्रसंगी अनेक प्रमुख नेते आणि मान्यवर उपस्थित होते. यामध्ये नॅशनल पीपल्स पार्टी चे महाराष्ट्र अध्यक्ष श्री अमित वेलुरकर पाटील, मुंबई जनता दल (सेक्युलर) चे अध्यक्ष श्री सुरेंद्रकुमार बाजपेयी, श्री कच्छी विसा ओसवाल जैन महाजनच्या सेक्रेटरी सीए पुष्पा शाह, महाराष्ट्र जनता दल (सेक्युलर) चे सरचिटणीस श्री विनोधन मोरे यांच्यासह इतर अनेक प्रतिष्ठित पाहुण्यांचा समावेश होता.

समारंभाला संबोधित करताना श्री अमित वेलुरकर पाटील म्हणाले की, श्री नवीन मारू हे गरीब रेशन कार्डधारकांचे मसिहा (तारणहार) आहेत. श्री विनोधन मोरे यांनी श्री नवीन मारू यांचे कौतुक करत त्यांचा उल्लेख एक महान योद्धा असा केला. श्री मोरे म्हणाले की, नवीन मारू हे केवळ रेशन दुकानदारांच्या हक्कांसाठीच नाही, तर शहरातील लाखो गरीब रेशनकार्डधारकांच्या हक्कासाठी आणि न्यायासाठी सातत्याने लढा देत असतात. सीए पुष्पा शाह म्हणाल्या की, श्री नवीन मारू यांच्या अथक परिश्रम, निस्वार्थी नेतृत्व आणि जनसेवेप्रती असलेल्या समर्पणामुळे समाजातील सर्व घटकांमध्ये त्यांचा मनापासून आदर केला जातो. कार्यक्रमाला उपस्थित सर्व मान्यवरांनी आणि हितचिंतकांनी त्यांच्या उदंड, निरोगी आणि यशस्वी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

## गुड शेफर्ड स्कूलमध्ये शिक्षक दिनाचा उत्साह;
### ज्येष्ठ नागरिकांच्या सहभागाने कार्यक्रमाला रंगत




बेलापूर : शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासोबतच शिक्षक आणि ज्येष्ठ नागरिकांमधील स्नेहबंध दृढ करणारा शिक्षक दिन सोहळा गुड शेफर्ड स्कूलच्या वतीने ५ सप्टेंबर रोजी सेक्टर १५, बेलापूर येथील महेश बँक्वेट्समध्ये उत्साहात पार पडला. द असोसिएशन फॉर सीनियर सिटीजन, मँगो गार्डन, सीबीडी बेलापूरच्या ज्येष्ठ नागरिकांनी कार्यक्रमात उत्स्फूर्त सहभाग घेतला.

मुख्याध्यापिका सौ. लता प्रकाश पवार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. यावेळी श्री. मच्छिंद्र मते, श्री. आर. के. मोदी, श्री. अजय माहेरा, श्री. विलास बर्वे आणि सौ. मंजीत कौर झुटी उपस्थित होते.

शिक्षकांनी सादर केलेले नृत्य व नाट्याविष्कार तसेच ज्येष्ठ नागरिकांनी सादर केलेल्या गीतांनी कार्यक्रमात उत्साहाचे वातावरण निर्माण केले.

विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या शिक्षकांचा रोख रक्कम व भेटवस्तू देऊन गौरव करण्यात आला. त्यानंतर स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले. अखेरीस सामूहिक 'वंदे मातरम्' गायनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

Printed and published by Bhimrao Hindurao Dhulap, Printed at Plaskot Industries, 23, Municipal Indl. Estate, K. K. Marg, Satrasta, Mumbai -400 011 and published at C/66, Mukuda Nagar, A-Ward, Laxmi Mandir, Dharavi, Mumbai - 400 017. Editor : Bhimrao Hindurao Dhulap, Mob. 9221117684
Any litigation against the content will be entertained under the jurisdiction of Mumbai only.

हे साप्ताहिक प्रकाशक, मुद्रक, मालक श्री. भिमराव हिंदुराव धुळप यांनी प्लासकोट इंडस्ट्रीज, २३, म्युनिसिपल इंडस्ट्रीयल इस्टेट, के. के. मार्ग, सातरस्ता, मुंबई -४०० ०११ येथून छापून सी/६६ मुकुंदनगर, ए/ वॉर्ड, लक्ष्मी मंदिर, धारावी, मुंबई - ४०० ०१७ येथून प्रकाशित केले. संपादक : भिमराव हिंदुराव धुळप. मो. ९२२१११७६८४
(प्रकाशित बातम्या / लेखांशी सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद मुंबई न्यायकक्षेत)